### अझोलातील घटक :



- प्रथिने २५-३० टक्के
- क्षारांचे प्रमाण १०-१५ टक्के
- कर्बोदके व मेद (फॅट) यांचे प्रमाण अतिशय कमी असल्यामुळे ते जनावरांना पचायला अतिशय सोप असते.

### अझोलाचा वापर :

- सुरूवातीचे १५ दिवस अझोला आणि पशुखाद्याचे समप्रमाणात मिश्रण करून जनावरांना खाऊ घालावे. अझोला हे पशुखाद्य म्हणून गाई, म्हशी, वराह, कोंबड्यांना देता येते. पशुखाद्य म्हणून वापर करतांना पशुतज्ञांचा सल्ला घ्यावा.
- दुधाळ जनावरांच्या नेहमीच्या खाद्यामध्ये अझोला आणि खुराक यांचे समप्रमाणात मिश्रण करून दिल्यास दुधामध्ये वाढ होते. त्यांची पचनक्षमताही सुधारते. जनावरांना अझोला खुराकासोबत किंवा स्वतंत्रपणे देखील देता येते.
- कोंबड्यांच्या नेहमीच्या आहारामध्ये दहा टक्क्यांपर्यंत अझोलाचे मिश्रण केल्यास त्यांची उत्पादनक्षमता वाढते. मांसल कोंबड्यांच्या वजनामध्ये झपाट्याने वाढ होते.
- वराहांच्या नेहमीच्या खाद्यात २० टक्क्यांपर्यंत अझोलाचा वापर करावा.
- मत्स्यपालनातही अझोला फायदेशीर आहे.
- कुक्कुटपालनामध्ये पक्ष्याचे वजन, अंड्याचे उत्पादन व त्याचा दर्जा व दुभत्या जनावरांमधील दूधात वाढ होण्यास मदत होईल.




**प्रकाशक**

डॉ.किरण कोकाटे
संचालक, विस्तार शिक्षण,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी


**संपादक**

डॉ.मिलिंद अहिरे
वरीष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख
कृषि विज्ञान केंद्र, धुळे

**सह-संपादक**

डॉ.गोरक्ष ससाणे
प्रभारी अधिकारी/प्राध्यापक,
विस्तार शिक्षण, म.फु.कृ.वि., राहुरी


# अझोला : पशुंचे पुरक खाद्य




**लेखक**

श्री. विपुल वसावे
विषय विशेषज्ञ (पशुविज्ञान व दुग्धशास्त्र)
कृषि विज्ञान केंद्र, धुळे

डॉ.मिलिंद अहिरे
वरीष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख
कृषि विज्ञान केंद्र, धुळे



प्रति : १००० म.फु.कृ.वि./विस्तार प्रकाशन/घडिपत्रिका/क्र.१०९४-ब/२०१६

महात्मा फुले कृषि विद्यापीठ
**कृषि विज्ञान केंद्र, धुळे**
दुरध्वनी क्र.(०२५६२)२३०३६२
संकेतस्थळ: http://www.kvkdhule.org.com,
*E-mail* :pckvkdhule@gmail.com

# अझोला : पशुंचे पूरक खाद्य -

अझोला या शेवाळाचे उत्पादन अतिशय कमी खर्चात व कमी वेळेत घरच्या घरच्या घरी करता येते. म्हणून चारा टंचाईच्या अथवा कमतरतेच्या काळाता अझोलाचा वापर पुरक पशुखाद्य म्हणून करणे फायदेशीर ठरते.

अझोला हे एक पाण्यावर वाढणारे शेवाळ आहे. याचा वापर आपण नत्र स्थिर करणारे जैविक खत म्हणून करतो. या अझोलामध्ये प्रथिनांचे प्रमाण भरपूर असते. त्याचबरोबर जनावरांच्या शरीरपोषणासाठी आवश्यक असणारी अशी अमिनो आम्ले कॅल्शिअम, फॉस्फरस, लोह, तांबे व मॅग्नेशिअम ही खनिजे मुबलक प्रमाणात असतात. यात अनेक पोषक घटक असल्याने पशुपालक आता याचा वापर एक पूरक पशुखाद्य म्हणून करत आहेत. दुभत्या जनावरांना प्रति दिवस १ ते दिड किलो अझोला दिल्यास दुधात सुमारे १० ते १५ टक्के वाढ संभवते.

या अझोलाचे पृथक्करण केल्यास हे एक आर्थिकदृष्टया परवडणारे पशुधनास पूरक असे खाद्य आहे. कारण यात असणाऱ्या प्रथिनांचे जास्तीचे प्रमाण व तंतूमय पदार्थाचे प्रमाण अत्यल्प असणे होय. यामध्ये असणाऱ्या प्रथिनांची गुणवत्ता बघितल्यास हे कमीत कमी खर्चात अधिक पोषणतत्वे उपलब्ध करून देणारे पूरक पशुखाद्य आहे.

### अझोला उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी


- पॉलिथीन कापड/प्लॅस्टिकचे कापड (हे कापड तारापौलिनचे असावे, जे सूर्याच्या अतिनील किरणांचा प्रतिरोध / परावर्तीत करू शकेल.)
- गांडूळ खत
- शेण (स्लरी करून)
- सिंगल सुपर फॉस्फेट
- अझोला कल्चर
- सूक्ष्म अन्नद्रव्ये



### उत्पादन घेतांना घ्यावयाची काळजी

- अझोला उत्पादनासाठी ५०% सुर्यप्रकाशाची आवश्यकता असते. म्हणून अझोलाचे उत्पादन करतांना शेडनेटचा वापर करावा. त्यामुळे प्रकाशाची तीव्रता कमी होण्यास मदत होईल.
- शेडनेटमधील तापमान हे २५ अंश सेल्सिअस असावयास हवे.
- दररोज खड्डयातील अझोला काढावे. त्यामुळे खड्डयामध्ये अझोलाची गर्दी होणार नाही.
- खड्डयातील पाण्याचा सामू ५.५-७.० च्या दरम्यान असणे आवश्यक. अझोलामध्ये वातावरणातील नत्राचे शोषण करून एकत्रीकरण करण्याची क्षमता असते. त्यामुळे यात प्रथिनें आणि जीवनसत्वांचे प्रमाण अधिक आढळून येते. म्हणून याचा पशु आहारामध्ये समावेश करणे फायद्याचे ठरते.

- अझोला उत्पादनासाठी दोन मीटर लांब, दोन मीटर रूंद आणि ०.२ मीटर खोलीचा वाफा तयार करावा. निवडलेल्या वाफ्याची जागा झाडाच्या सावलीखाली असावी. वाफ्यावर थेट सूर्यप्रकाश येईल अशी जागा निवडू नये.



- वाफ्याच्या तळामध्ये प्लॅस्टिकचा कागद अंथरावा. त्यानंतर १५ ते २० किलो सुपीक माती या प्लॅस्टिकच्या कागदावर समपातळीत पसरावी.
- दहा लिटर पाण्यामध्ये दोन किलो शेण आणि ३० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेटचे मिश्रण करून या वाफ्यात ओतावे. त्यानंतर वाफ्यामध्ये दहा से.मी. उंचीएवढे पाणी ओतून एक किलो शुध्द अझोला कल्चर वाफ्यातील पाण्यात सोडावे.
- वाफ्याचे चारही कोपरे एका पातळीवर असावेत. त्यामुळे पाण्याची पातळी स्थिर राहील.



- या वाफ्यामध्ये दर १५ दिवसाआड एक किलो शेण आणि २० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट मिसळावे. त्यामुळे अझोलाची वाढ चांगली होते.
- वाफ्यातील पाण्याची पातळी कमी होणार नाही याची काळजी घ्यावी.
- साधारणपणे १५ दिवसानंतर या वाफ्यात अझोला पूर्णपणे वाढलेले दिसेल. २X२X०.२ मीटर एवढ्या आकाराच्या वाफ्यातून साधारणतः ४०० ते ५०० ग्रॅम प्रति स्के. मी. एवढा अ‍ॅझोला मिळतो. अझोल्याला शेणाचा वास येत असल्यास जनावरांना खाऊ घालण्या अगोदर पाण्याने स्वच्छ धुवावा.
- सहा महिन्यातून एकदा पूर्ण वाफ्याची स्वच्छता करून नवीन अझोला त्यामध्ये मिसळावा.
- तयार झालेला अझोला जनावरांना खाऊ घालण्याच्या अर्धा तास अगोदर सावलीत ठेवावा.